# नाशिक जिल्हाधिकारी, छत्रपती शाहु महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती, नागपुर आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## यांच्या संयुक्त विद्यामाने

## मातोश्री वसतीगृहातील रिक्त जागांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

## जाहिरात : - २०२४-२५

शासन निर्णय क्रमांक: वसति ५३१७/प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा लक्षीत गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपुर मार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशा प्रकारे लक्षित घटकातील एकूण २०० मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यात आलेले आहे.

त्यानुसार मातोश्री वस्तीगृहातील एकूण १० रिक्त जागांकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

- **त्यानुसार रिक्त जागांच्या तपशील खालील प्रमाणे :**

| अ.क्र. | प्रवर्ग | टक्केवारी | जागा | रुजू झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|
| १. | इतर मागास वर्ग | ५९ % | ४४ | ४४ | ० |
| २. | विमुक्त जाती | १० % | ७ | ४ | ३ |
| ३. | भटक्या जमाती – ब | ८ % | ६ | ५ | १ |
| ४. | भटक्या जमाती – क | ११ % | ८ | ५ | ३ |
| ५. | भटक्या जमाती – ड | ६ % | ५ | ५ | ० |
| ६. | विशेष मागास प्रवर्ग | ६ % | ५ | २ | ३ |
| | **एकूण** | **१०० %** | **७५** | **६५** | **१०** |

- **महाज्योती संस्था निकष, अटी व शर्ती खालील प्रमाणे :-**

१. मातोश्री मुलींच्या वसतीगृहात प्रवेश देताना सामाजिक प्रवर्ग निहाय रिक्त असलेल्या जागा विचारात घेऊन व कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या मुलींनाच प्रवेश देण्यात येईल.

२. उर्वरित जागांपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास जागा भरताना प्रथम प्राधान्य हे व्यावसायिक पदवी (जसे की, वैद्यकीय, अभियांत्रिकी, विधी, वास्तुशास्त्रज्ञ, कृषी आदी), द्वित्तीय प्राधान्य हे बिगर व्यावसायिक पदवी (विज्ञान, वाणिज्य, कला आदी)

३. व्यावसायिक पदवी अंतर्गत मर्यादेपेक्षा जास्त अर्ज असल्यास प्रथम प्राधान्य हे व्यावसायिक पदवीतील पदव्युत्तर पदवी त्यानंतर पदवी, त्यानंतर पदविका व त्यानंतर ITI व तत्सम शिक्षण घेणाऱ्या मुलींना देण्यात येईल. जास्त अर्ज आल्यास मागील वर्षी ज्या मुलींना जास्त गुण होते त्या आधारावर गुणांनुसार प्राधान्य देण्यात येईल. ज्या ठिकाणी समान गुण असतील त्या ठिकाणी वयोमानानुसार जेष्ठता विचारात घेऊन त्या मुलींना प्राधान्य देण्यात येईल.

४. बिगर व्यावसायिक पदवी अंतर्गत मर्यादेपेक्षा जास्त अर्ज असल्यास प्रथम प्राधान्य हे बिगर व्यावसायिक पदवीतील पदव्युत्तर पदवी शिक्षण घेणाऱ्या मुलींना देण्यात येईल. जास्त अर्ज आल्यास मागील वर्षी ज्या मुलींना जास्त गुण होते त्या आधारावर गुणांनुसार प्राधान्य देण्यात येईल. ज्या ठिकाणी समान गुण असतील त्या ठिकाणी वयोमानानुसार जेष्ठत्ता विचारात घेण्यात येऊन त्या मुलींना प्राधान्य देण्यात येईल.

५. प्रवेशासाठी अर्ज केला याचा अर्थ प्रवेश निश्चित झाला असा होणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. मातोश्री मुलींच्या वसतीगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मुलींनी शासनाच्या इतर वसतीगृह योजनेचा याआधी लाभ घेतलेला नसावा किंवा वसतिगृह ऐवजी देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**महाज्योती विभागीय कार्यालय**

पत्ता :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, समाज कल्याण कार्यालय, नाशिक पुणे-रोड, नाशिक-४२२०११.

संपर्क: - ८०८७५७६३९३ ई मेल - mahajyotinsk@gmail.com संकेतस्थळ :- http//mahajyoti.org.in

सदरची जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित करून पोस्टाद्वारे/प्रत्यक्ष महाज्योती संस्थेचे विभागीय कार्यालय, नाशिक येथे वरील पत्त्यावर दिनांक २९-१२-२०२४ पर्यन्त सादर करावेत.

टीप :

१. वसतिगृह लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा दुहेरी आर्थिक लाभ घेतलेला नसावा.

२. वसतिगृहात प्रवेश देण्यात येणाऱ्या पात्र मुलींची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

३. पात्र विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रत्यक्ष दाखल (हजर) होण्याचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

४. उर्वरित रिक्त जागेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास व्यावसायिक अभ्यासक्रम व मागील शैक्षणिक वर्षात मिळालेल्या गुणांच्या आधारे सदरील विद्यार्थिनींनीचा प्रवेश निश्चित केला जाईल.

उपरोक्त प्रवेशाच्या जागा व धोरणांमध्ये बदल करणेचा अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती मुख्य कार्यालय, नागपुर यांचा असेल.

(स्वा.)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाज्योती, नागपूर.